महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६७ वा | दिनांक : ०५/०४/२०२५ | वार : शनिवार

## अजित पवार सत्तेसाठी लाचार झालेत : हर्षवर्धन सपकाळ यांचा वक्फ विधेयकावरून हल्लाबोल



**मुंबई :** भारतीय जनता पक्षाला पाठिंबा देत सरकारमध्ये सहभागी झालो तरी शिव, शाहु, फुले, आंबेडकरांच्या विचाराचा वारसा सोडला नाही असे सांगणाऱ्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा खरा चेहरा उघडा पडला आहे. भाजपा सरकारने आणलेल्या वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा देऊन अजित पवार यांनी सत्तेसाठी भाजपापुढे लोटांगणच घातले असल्याचा घणाघाती हल्ला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

लोकसभेने वक्फ दुरुस्ती विधेयकावर बुधवारी मध्यरात्री २ च्या ठोक्याला आपली मोहोर उमटवली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी हे विधेयक संसदेच्या वरिष्ठ सभागृहात मांडण्यात आले. या सभागृहाने गुरुवारी मध्यरात्री २ च्या सुमारास हे विधेयक हातावेगळे केले. आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले जाईल. त्यांची त्यांच्यावर स्वाक्षरी झाली की या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल. या विधेयकाला अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पाठिंबा दिला आहे. यावरून हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अजित पवार यांनी काका शरद पवार यांचा पक्ष भाजपाच्या मदतीने चोरून पक्षाचे नाव व चिन्हही घेतले व सत्तेसाठी धर्मांध शक्तीच्या बाजूला जावून बसले. तेव्हापासून ते सातत्याने आपण विकासासाठी सत्तेत सहभागी झालो असलो तरी, पुरोगामी विचार सोडला नाही असे बिंबवण्याचा प्रयत्न ते करत आहेत. त्यांनी एका इफ्तार पार्टीत सहभागी होत मुस्लिम समाजाला त्रास देणाऱ्यांना सोडणार नाही, माफ केले जाणार नाही, अशा वल्गना केल्या. मुस्लिम समाजाच्या पाठीमागे आहे असे सांगून चार दिवस होत नाहीत, तोच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने वक्फ सुधारणा विधेयकाला पाठिंबा देऊन मुस्लिम समाजाचा विश्वासघात केला.

वक्फ विधेयक हा केवळ मुस्लिम समाजाला घाबरवून वक्फ बोर्डाची लाखो एकर जमीन ताब्यात घेण्याचा भाजपा सरकारचा डाव आहे. मुंबईत धारावीसह अनेक महत्वाच्या जमिनी एका विशेष उद्योगपतीला देण्याचा सपाटा भाजपा सरकारने लावला आहे. उद्या वक्फच्या जमिनी ताब्यात घेऊन त्या जमिनी हे सरकार लाडक्या उद्योगपतींच्या घशातच घालणार आहे हे अजित पवार यांच्यासारख्या नेत्याला माहित नाही असे नाही. पण सत्तेशिवाय राहू न शकणाऱ्या अजित पवारांनी खुर्चीसाठी भाजपासमोर लाचार होऊन विधेयकाला पाठिंबा दिला आहे.

अजित पवार यांनी हा मुस्लीम समाजाला दिलेला धोका आहे. त्यामुळे अजित पवार यांचे खायचे दात व दाखवायचे दात वेगळे आहेत हे जनतेने लक्षात घेऊन सावध व्हावे असा इशाराही काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी दिला आहे.

## अंजली दमानियांनी काढले बीडचे नवे प्रकरण



**मुंबई :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीड जिल्ह्यातील सावकारी जाचाचे नवे प्रकरण बाहेर काढले आहे. या प्रकरणातील एका भावावर सावकारी जाचामुळे घर सोडण्याची वेळ आली, तर दुसऱ्याने भाऊबीजेच्या दिवशी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली, असे त्यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे या प्रकरणातील सावकार माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळच्या वर्तुळातील असल्याचा आरोपही त्यांनी यासंबंधी केला आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या, काल मी जालन्यात आले, तेव्हा मला बीडवरून बोबडे नामक एक कुटुंब भेटण्यासाठी आले होते. या कुटुंबातील मंगेश व बजरंग नामक दोन मुलांनी एक राईस मिल चालू करण्यासाठी सावकारांकडून काही कर्ज घेतले होते. त्यांनी ही राईस मिल सुरू केली. पण दुर्दैवाने कोविड काळात त्यांचे नुकसान झाले. त्यानंतर त्यांनी ज्या सावकारांकडून कर्ज घेतले होते, त्यांनी त्यांचा अमाप छळ केला. त्यामुळे एक भाऊ घर सोडून निघून गेला, तर दुसऱ्या भावावर भाऊबीजेच्या दिवशी गळफास घेण्याची वेळ आली. एवढे या सावकारांनी त्यांना छळले होते.

सदर मुलाने गळफास घेऊन आत्महत्या करण्यापूर्वी एक सुसाईड नोट लिहिली होती. त्यात त्याने त्यांना त्रास देणाऱ्या सर्व लोकांची नावे लिहिली होती. पण आजतागायत त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. पोलिसांनी या प्रकरणी कोणतीही कारवाई केली नसल्यामुळे एक संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले. त्यामुळे त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी बीडच्या दौऱ्यावर जाणार आहे. तेथील पोलिस अधीक्षकांशी बोलून त्यांना या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्याची विनंती करणार आहे.

अंजली दमानिया यांनी यावेळी या प्रकरणातील माणसे माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळची असल्याचाही आरोप केला. बीड जिल्ह्यातील एमआयडीसी भागातील हे प्रकरण आहे. हे सर्वच सावकार राजकारणात सक्रिय असून, धनंजय मुंडे यांच्या जवळचे आहेत. यापैकी एक माणूस हा ठाकरे गटाचा आहे, असे त्या म्हणाल्या.

अंजली दमानिया यांनी यावेळी संतोष देशमुख हत्याकांडावरही भाष्य केले. त्या म्हणाल्या, संतोष देशमुख हत्या प्रकरणात सद्यस्थितीत मला अनेक गोष्टी झालेल्या दिसत नाहीत. मी या मुद्यावर काल मनोज जरांगे व धनंजय देशमुख यांच्याशीही चर्चा केली. या प्रकरणात सुदर्शन घुले याचा कबुलीजबाब अर्धवट आला आहे. त्याच्यातून अनेक गोष्टी स्पष्ट होत नाहीत. त्याच्यात केवळ हत्या होईपर्यंतचाच उल्लेख आहे. पण हत्या केल्यानंतर जे फरार झाले, तेव्हा कुठे राहिले? ते भिवंडीला कसे पोहोचले? तेथून पुण्याला कसे आले? त्यांना कुणी आर्थिक मदत केली? कराडसोबत त्यांचे बोलणे झाले की नाही? या कोणत्याच गोष्टींचा त्यात उल्लेख नाही.

पोलिसांनी त्याचा जबाब अर्धवट कसा घेतला? याशिवाय शिवलिंग मोराळे, बालाजी तांदळे, डॉक्टर वायबसे यांच्याविषयी या प्रकरणातील आरोपपत्रात चकार शब्दही लिहिण्यात आला नाही. एवढेच नाही तर राजेश पाटील व प्रशांत महाजन या पोलिस अधिकाऱ्यांचे व्हिडिओ संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. त्यांचाही त्यात उल्लेख नाही. त्यामुळे अशा अनेक गोष्टी पुरवणी आरोपपत्रात येण्याची गरज आहे, असे दमानिया यांनी म्हटले आहे.

## वक्फ दुरुस्ती विधेयकाविरोधात ८ राज्यांमध्ये निदर्शने

**नवी दिल्ली :** संसदेने वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर केल्याच्या विरोधात देशात निदर्शने सुरू आहेत. शुक्रवारच्या नमाजनंतर, पश्चिम बंगाल, गुजरात, बिहार, झारखंड, तामिळनाडू, तेलंगणा, कर्नाटक, आसाममध्ये मुस्लिमांनी रस्त्यावर उतरून निषेध केला. यामध्ये महिला आणि मुलांचाही समावेश आहे.

उत्तर प्रदेशातील सर्व ७५ जिल्ह्यांमध्ये पोलिस हाय अलर्टवर आहेत. ध्वज मार्च सुरूच आहे. लखनौमधील दर्गे आणि मशिदींवर ड्रोनद्वारे नजर ठेवली जात आहे. वक्फ दुरुस्ती विधेयकाला पाठिंबा दिल्याबद्दल उत्तर प्रदेश अल्पसंख्याक आयोगाचे माजी अध्यक्ष अश्फाक सैफी यांना जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या. त्याच्या मेहुण्याला मारहाण करण्यात आली.

गुजरातमधील अहमदाबादमध्ये मुस्लिम समुदायातील शेकडो लोक रस्त्यावर जमले. त्यांच्या पोस्टर्स आणि बॅनरवर लिहिले होते - वक्फ बिल परत घ्या, यूसीसी नाकारा. लोकांच्या हातावर काळ्या पट्ट्या बांधलेल्या होत्या. जमावाने "हुकूमशाही चालणार नाही" अशा घोषणा दिल्या. पोलिसांनी ५० जणांना ताब्यात घेतले.

पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील पार्क सर्कस क्रॉसिंगवर हजारो लोक रस्त्यावर जमले. येथेही लोक वक्फ विधेयक रद्द करण्याची मागणी करणारे बॅनर आणि पोस्टर्स घेऊन निषेध करत आहेत. कोलकातामध्ये अनेक ठिकाणी निदर्शने सुरू आहेत. वक्फ विधेयकाच्या निषेधार्थ लोकांनी फलक जाळले.

रांचीमध्येही गोंधळ सुरू आहे. लोक म्हणाले की वक्फ विधेयक देशासाठी योग्य नाही, ते मुस्लिमांसाठी योग्य नाही. बिहारमध्येही लोक या विधेयकाविरुद्ध रस्त्यावर उतरून निषेध करत आहेत.

तामिळनाडूमध्ये अभिनेता विजय यांच्या तामिलगा वेत्री कझगम पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विधेयकाविरुद्ध निदर्शने केली. असे होऊ नये. ही अल्पसंख्याकांची, मुस्लिमांची संस्था आहे आणि तिला अशा प्रकारे बुलडोझरने उद्ध्वस्त करून राज्यसभेत मंजूर करणे, मला वाटते की ते दरोडा टाकण्यासारखे आहे, जे खूप चुकीचे आहे जे घडू नये.

भाजपला मुस्लिमांसाठी बोलण्याचा कोणताही नैतिक किंवा राजकीय अधिकार नाही आणि वक्फ विधेयक मंजूर करून आरएसएस-भाजप राजवटीने त्यांचे मुस्लिमविरोधी, अल्पसंख्याकविरोधी हेतू सिद्ध केले आहेत. आज भारताने क्रूर बहुसंख्याकवादाच्या काळ्या युगात प्रवेश केला आहे, जिथे अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांना दार दाखवले जाते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ एप्रिल २०२५


## केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी शाळेत एक पाऊल पुढे उत्सव साजरा करण्यात आला




**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर येथे स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल या प्रकल्पांतर्गत बालवाडी मधील प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचा इयत्ता पहिली मध्ये एक पाऊल पुढे या कार्यक्रमांतर्गत प्रवेश उत्सव घेण्यात आला. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री मदन काका नवपुते यांनी भूषविले तसेच प्रमुख अतिथी म्हणून माननीय उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख श्री अंकुशजी पांढरे साहेब उपस्थित होते.तसेच मनपा शिक्षण अधिकारी श्री भरत तीनगोटे साहेब, कार्यक्रम अधिकारी श्री सांगळे साहेब,विस्तार अधिकारी श्री रामनाथ थोरे साहेब, केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक चौधरी सर, शालेय समितीचे सदस्य श्री नंदकिशोर दहीहंडे,श्री रामेश्वर कोरडे,श्री भागिनाथ नवपुते, श्री किसन आप्पा नवपुते, श्री सुनील भाऊ नाडे,श्रीमती अश्विनी डांगे, सुमैया शेख, निशा मगरे,सरला खरात यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मालोदे मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती शिंदे मॅडम यांनी केले व आभार प्रदर्शन श्रीमती भिंगोले मॅडम यांनी केले. या कार्यक्रमांतर्गत शाळेतील गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा उपायुक्त यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. URC-1 च्या आस्मा मॅडम व हिवराळे मॅडम,तबसूम शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर वाघ सर,राठोड सर,तारो मॅडम,गणोरीकर मॅडम, भारद्वाज मॅडम, पाटील मॅडम, कानडे मॅडम,पठाण सर,पठाडे सर, चव्हाण सर,सूर्यवंशी सर, साबळे मावशी, विशाखा रेवनवार मॅडम यांनी परिश्रम घेतले.

## केंद्रिय प्राथमिक शाळा किराडपुरा शाळेतील पहिली प्रवेशासाठी "एक पाऊल पुढे" कार्यक्रम संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** मा. आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत साहेबांच्या संकल्पनेतून स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता बालवाडी ते पहिली प्रवेशासाठी "एक पाऊल पुढे" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. राजेश चौधरी (अधिवक्ताथा डाईट), श्री. उसामा कादिर मौलाना(एनजीओ), श्रीमती अर्पिता मॅडम (स्मार्ट सिटी), श्री. फहीम अन्सारी, श्री. काझिम अन्सारी, तसेच समग्र शिक्षेच्या श्रीमती फरहीन मॅडम उपस्थित होते.या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका रईसा मॅडम यांनी शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध असून, इतर शाळांच्या तुलनेत येथील शिक्षण अधिक चांगले आहे. तसेच, शिक्षकवर्ग विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी कठोर परिश्रम घेत आहे.प्रमुख पाहुणे श्री. राजेश चौधरी यांनी आपल्या भाषणात शाळेच्या विकासाविषयी विचार मांडले आणि मुख्याध्यापिकांच्या कार्याचे कौतुक केल.

# मनपाच्या चार शाळेत पहिल्याच दिवशी पहिलीच्या प्रवेशासाठी झाली गर्दी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका शाळेच्या परिसरात सुरू असलेल्या बालवाडी वर्गातील प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे इयत्ता पहिली मध्ये प्रवेश करून घेण्यासाठी एक पाऊल पुढे हा उपक्रम आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या संकल्पनेतून आज सर्व महानगरपालिकेच्या ५३ शाळेत राबविण्यात आला. पहिल्याच दिवशी महानगरपालिकेच्या शाळेत ४८२ मुले व ५३३ मुली असे एकूण १०१५ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत. आपल्या पाल्याचे /विद्यार्थी चे प्रवेश महानगरपालिका शाळेत घेण्यासाठी पालकांनी गर्दी केली होती, महानगरपालिका नारेगाव मराठी शाळेत ८० मनपा किराडपुरा no १ शाळेत ८० नारेगाव उर्दू येथे ६३ आणि मनपा प्रा शाळा चेलीपुरा या शाळेत ५० प्रवेश पहिल्याच दिवशी झाले आहेत या चारही शाळेत प्रवेश क्षमता इतके प्रवेश पहिल्याच दिवशी झाले आहेत महानगरपालिकेचे उप आयुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे यांच्या शुभहस्ते मनपा प्राथमिक शाळा चिकलठाणा या शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज भरून या मोहिमेचे उद्घाटन केले या शाळेत सामाजिक कार्यकर्ते मदन काका नावपुते ,भारत तीनगोटे शिक्षण अधिकारी ,रामनाथ थोरे शिक्षण विस्तार अधिकारीआणि ज्ञानदेव सांगळे कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.तसेच मनोज गर्जे उपसंचालक नगर रचना यांच्या हस्ते मनपा के प्रा शाळा सिडको एन ७ या शाळेत प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले सर्व शाळेत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ,पालक अधिकारी यांच्या उपस्थिती मध्ये एक पाऊल पुढे हा उपक्रम राबविण्यात आला प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी सर्व शाळा आणि इयत्ता पहिलीच वर्ग आकर्षक सजवण्यात आला होता, शैक्षणिक गुढी उभारली होती शाळेतील नाविन्यपूर्ण बँड वाजवून फुले टाकून त्यांचे स्वागत केले विद्यार्थ्यांचे उंची वजन अशी माप घेऊन त्यांच्या पाऊलखुणा घेण्यात आल्या व *एक पाऊल पुढे * हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला या सर्व विद्यार्थ्यांची ३० एप्रिल २०२५ पर्यंत शाळेतील क्रीडा व संगीत प्रशिक्षक तसेच कला क्रीडा व कार्यानुभव निदेशक आणि बालताई व इयत्ता पहिलीच्या शिक्षकामार्फत खेळता खेळता शिका या संकल्पनेतून गाणी गप्पा गोष्टी विविध खेळाच्या माध्यमातून भाषा व गणन विकास सोबतच विद्यार्थ्यांचा शारीरिक सामाजिक आणि भावनिक विकास करण्यात येणार आहे तसेच निपुण उत्सव कार्यक्रम अंतर्गत इयत्ता २ ते ५ मधील विद्यार्थ्यांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान कौशल्य विकसित करण्यात येत आहेत. मनपा शाळेत Smart School to Best School प्रकल्प अंतर्गत शाळेत विविध उपक्रम राबविले जात आहेत त्या मध्ये कंटेनर लायब्ररी, रोबोटिक्स, स्मार्ट डिजिटल बोर्ड वर शिक्षण ,संगीत व क्रीडा शिक्षक नियुक्ती , शाळेत ग्राउंड विकसित करून सिंथेटिक टर्फ अशा विविध उपक्रमामुळे गेल्या वर्षी २० शाळेत प्रवेश क्षमता पेक्षा जास्त प्रवेश झाले होते म्हणून या वर्षी इयत्ता पहिली मध्ये प्रवेशा साठी शाळेच्या परिसरात सुरू असलेल्या बालवाडी/ अंगणवाडी वर्गातील विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात आले आज पासून या प्रवेश प्रक्रिया la सुरवात झाली आहे पुढच्या वर्षी मनपा शाळेत जर्मन व जपान भाषेचे शिक्षण आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी गुणवत्तेची पंचसूत्री हा उपक्रम राबविला जाणार आहे हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माननीय आयुक्त तथा प्रशासक महोदय यांच्या सूचनांनुसार अंकुश पांढरे उप आयुक्त व गणेश दांडगे नियंत्रण अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ थोरे आणि ज्ञानदेव सांगळे कार्यक्रम अधिकारी तसेच गोविंद बाराबोटे अधीक्षक आणि सर्व मुख्याध्यापक व शिक्षक, बालताई यांनी प्रयत्न केले आहेत


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ एप्रिल २०२५

## जे. ई.एस. महाविद्यालयात सर्जनशीलता आणि नाविन्य या विषयावर एक दिवसीय नवलेखक कार्यशाळा संपन्न

**जालना ((प्रा. राजेंद्र सोनवणे)** : नवीन शैक्षणिक धोरणावर जेव्हापासून चर्चा सुरू झाली असून, तेव्हापासून नावीन्य हा शब्द चर्चेत आला आहे. सृजनाच्या क्षेत्रात सतत नवीन आणि त्याची सर्जनशील अभिव्यक्ती स्वीकारणे म्हणजे सर्जनशील नवनिर्मिती होय. ही नवनवीनता स्वीकारून जी भाषा आणि साहित्य पुढे सरकते, ती भाषा आणि तिचे साहित्य विकसित होते आणि सर्वसामान्यांच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता असते. वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या स्कूल ऑफ ट्रान्सलेशन अँड सिलेक्शनच्या प्राध्यापिका डॉ.मीरा निचले यांनी सांगितले. जे.ई.एस. महाविद्यालय, जालना आणि श्रीमती दानकुवर महिला महाविद्यालय जालना, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सर्जनशीलता आणि नाविन्य या विषयावर ऑनलाइन कार्यशाळा आयोजित करण्यात आली या एकदिवसीय नवीन लेखक कार्यशाळेत विशेष अतिथी म्हणून डॉक्टर मीरा निचले , बोलत होत्या.

आज, डिजिटल युगाने विद्यार्थी आणि तरुणांसाठी रोजगाराच्या अनेक नवीन संधी खुल्या केल्या आहेत, त्यांना फक्त त्या खुल्या मनाने पाहण्याची आणि त्यांची कार्यक्षमतेने अंमलबजावणी करण्याची गरज आहे. भाषेच्या क्षेत्रात करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांना आता डिजिटल युगात नोकरीच्या मागे धावण्याची गरज नाही, रोजगार आपोआप त्यांच्यापर्यंत पोहोचेल. एक काळ असा होता की कविता लिहिल्यानंतर गुलाबाच्या फुलासोबत कविता नोटबुकमध्ये बंद करून ठेवावी लागे आणि ती प्रकाशित करण्यासाठी त्यांना प्रकाशक मिळेना. पण आज या नव्या माध्यमांमुळे कोणताही कवी आपल्या सादरीकरण कौशल्याने देशाच्याच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचू शकतो. असेही डॉक्टर निचले यांनी सांगितले. कार्यशाळेचे उद्घाटन जे.ई.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी केले. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री म्हणाले की,जालना हे बहुभाषिक शहर असल्याने विविध मातृभाषा असलेली कुटुंबे येथे राहतात. परस्पर संवादासाठी ते फक्त हिंदी भाषेचा वापर करतात. त्यामुळे जालन्यात हिंदी सक्तीने नव्हे तर स्वेच्छेने स्वीकारली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घेऊन आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने करिअरच्या नवीन संधी शोधण्याची गरज आहे. असे मत त्यांनी उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले.या कार्यशाळेच्या वक्त्या धर्माबाद येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या प्रमुख डॉ.प्रतिभा येरेकर म्हणाल्या की, सर्जनशीलता ही भावनांची यशस्वी अभिव्यक्ती आहे. अभ्यासक्रमांची रचना करताना विद्यापीठात थीमॅटिक इनोव्हेशन लक्षात ठेवले जाते.शैक्षणिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणही मिळाले पाहिजे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार विद्यापीठांच्या अभ्यासक्रम समित्या अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांना सातत्याने अभ्यासक्रमांमध्ये जोडत असतात. काळाची गरज लक्षात घेऊन सुधारणा आणि निर्मितीचा हा उपक्रम निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आज नवीन शैक्षणिक धोरणात इनोव्हेशन हा शब्द ठळकपणे वापरला गेला आहे. विद्यार्थ्यांनी हा नवोपक्रम स्वीकारून सर्जनशीलतेला नवे आयाम देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असेही डॉ.प्रतिभा येरेकर यांनी सांगितलेयावेळी जे ई एस महाविद्यालयाचे हिंदी विभाग विभागप्रमुख डॉ.नानासाहेब गोरे म्हणाले की, बदललेल्या परिस्थितीनुसार महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आणि शिक्षण व्यवस्थेशी संबंधित शिक्षकांच्या मूल्यमापनाच्या पद्धती दिवसेंदिवस बदलत आहेत. महाविद्यालय आणि त्यात सेवा देणारे प्राध्यापक नवीन तंत्रज्ञानाशी कितपत जोडलेले आहेत आणि ते नवीन तंत्रज्ञानाचा अध्यापन प्रक्रियेत कसा वापर करत आहेत, याचे सातत्याने मूल्यमापन केले जात आहे. विद्यार्थ्यांनीही नाविन्यपूर्णतेच्या माध्यमातून या नवीन तंत्रज्ञानाशी जोडले जाणे आवश्यक आहे. जेव्हा शिक्षक स्वतः नवकल्पना आत्मसात करतील आणि त्यांची शिकवण्याची कौशल्ये वेळेवर आणि सुसंगत बनवतील तेव्हाच विद्यार्थी नाविन्यपूर्ण प्रक्रियेशी जोडू शकतील. त्यामुळे केवळ विद्यार्थ्यांनीच नाही तर शिक्षकांनीही नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण क्षमतेने अध्यापन करणे गरजेचे आहे., असेही डॉ.गोरे यांनी सांगितलेया प्रस्तावावर आपल्या भाषणात दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना येथील हिंदी विभागप्रमुख प्रा. पार्वती देशमुख म्हणाल्या की, आजची शिक्षणपद्धती तंत्रज्ञानासोबत कौशल्यावर आधारित आहे. कौशल्य आणि तंत्रज्ञानाच्या संयोगाने रोजगाराच्या नवीन संधी शोधण्यासाठी विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित केले पाहिजे, म्हणून विद्यापीठाने आपल्या अभ्यासक्रमांमध्ये या कौशल्यांचा समावेश केला आहे.विद्यार्थ्यांना याविषयी व्यावहारिक माहिती मिळावी म्हणून आम्ही ही कार्यशाळा आयोजित केली असल्याचेही डॉक्टर देशमुख यांनी सांगितले. यावेळी अध्यक्षीय समारोप समारंभात दानकुंवर महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर तळेकर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्याकला आणि कलागुणांना वाव देणे ही महाविद्यालयाची प्राथमिक गरज आहे. या कार्यशाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आकार देण्याचे प्रकार घडू शकतात. या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल आणि ते नवीन कौशल्याकडे सखोल अभ्यास सुरू करतील. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सीमा गुप्ता यांनी केले तर उपस्थित आमचे आभार डॉ.वैशाली श्रीमंडळे यांनी मानलेत. या कार्यशाळेत डॉ.जयश्री वाडेकर, डॉ.प्रवीण चंदनशिवे, डॉ.विद्या पटवारी, डॉ.गजानन देशमुख यांच्यासह प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## योग शिक्षक संघाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी गीता कोल्हे



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी श्रीमती गीता विष्णू कोल्हे यांची निवड झाली असून, याबद्दल त्यांचे योगा ग्रुपच्या महासचिव शिल्पा शेलगावकर , माजी जिल्हाध्यक्ष बालकुमार चाटला , जालन्यातील चेतन्ययोग केंद्राचे प्रमुख श्री. जोशी, श्री. खोत, योग शिक्षक श्री. पाल सर, अंबड येथील योगशिक्षक देवानन्द चित्राल, जालन्यातील प्रसिद्ध उद्योजक राजेश कामड, डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालय शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, ग्रामविकास अधिकारी श्री. विष्णू कोल्हे,शिल्पा पारीख, स्वप्नजा तुपकर, गीता वलकट्टी, सारिका वाघमारे, ज्योती चौधरी, संतोषी देशमुख, सुनिता जगताप आदींनी अभिनंदन केले आहे.

## श्री रामनवमी जन्मोत्सव समिती अध्यक्ष पदी विजय भाऊ चव्हाण यांची निवड



**कन्नड (अक्षय चव्हाण)** : कन्नड मध्ये मागिल ११ वर्षापासून श्रीराम नवमी साजरी केली जात आहे. याच रामनवमी ची सुरवात स्वराज्य रक्षक संघ कन्नड या संघटनेने प्रथम केलेली आहे . काल स्वराज्य रक्षक संघात रामनवमी निमित्त झालेल्या बैठकीत स्वराज्य संघाच्या एक मताने अध्यक्ष पदी विजय भाऊ चव्हाण यांची निवड करण्यात आली यावेळी संघटन प्रमुख नितीन जी राठोड, कैलासभाऊ जाधव, कृष्णा भाऊ बडग, संजयजी पंडीत, डॉ. संजय तेली, अमोलजी तागवले, दिपकजी डोळस, उमेश सातदिवे, जयेश देशमुख,आदित्य पाटील,योगीराज भाऊ साबळे, संदेश उदासी, विजय बोरसे, उमेश राठोड, प्रमोदजी ढोले आदी उपस्थित होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ एप्रिल २०२५


# कन्या दिनानिमित्त गदाना येथे विशेष कार्यक्रम संपन्न




**खुलताबाद (शिवाजी गायकवाड) :** खुलताबाद तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, गदाना येथे दिनांक ०२ एप्रिल २०२५ रोजी कन्या दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून खुलताबाद तहसीलदार श्री. स्वरूप कंकाळ यांनी स्वतः उपस्थिती लावली. त्यांच्यासोबत ग्राम विस्तार अधिकारी, महसूल अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र गदाना येथील डॉक्टर, गावातील सरपंच, उपसरपंच तसेच ग्रामपंचायतीचे काही सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमात महिला व मुलींच्या सन्मानाचा कार्यक्रम, बेटी बचाओ – बेटी पढ़ाओ विषयावर मार्गदर्शन, तसेच महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विशेषतः, मुलींसाठी स्वतःला सक्षम बनवण्याबाबत प्रेरणादायी व्याख्यान, कला व साहित्य स्पर्धा, तसेच स्वास्थ्य आणि शिक्षण विषयक चर्चासत्रे आयोजित करण्यात आली.या कार्यक्रमास तहसीलदार श्री. स्वरूप कंकाळ यांनी उपस्थित ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व, त्यांच्या सशक्तीकरणाची आवश्यकता आणि समाजात त्यांना मिळणाऱ्या संधी यावर प्रकाश टाकला.याच कार्यक्रमादरम्यान, इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी राजश्री अशोक अधाने हिचा वाढदिवस असल्याने तहसीलदार स्वरूप कंकाळ आणि मान्यवरांनी तिचे स्वागत करून तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, केंद्रप्रमुख, तसेच अंगणवाडी कार्यकर्त्या आणि आशा सेविका यांनी मोलाचे योगदान दिले.कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक नदी सर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानत कार्यक्रमाच्या यशस्वी पार पडल्याची घोषणा केली.

# विद्यार्थ्यांच्या विकासासाची जबाबदारी शिक्षक आणि पालकांची- प्रा.राजेश ताले



**वाशिम (महेश मुंढे) :** पीएम श्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा विठोली,ता.मानोरा,जि. वाशिम येथे पी.एम.श्री योजनेअंतर्गतविद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाकरिता प्रमुख मार्गदर्शक म्हणून जेसीआय इंडिया द्वारा आऊटस्टँडिंग यंग पर्सन ऑफ द इंडिया अवॉर्ड २०२४ चे विजेते,स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायझेशन चे अध्यक्ष,राष्ट्रीय व्याख्याते प्रा. राजेश ताले उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद माध्यमिक शाळा विठोली चे मुख्याध्यापक संतोष काईट सर प्रमुख अतिथी मानोरा चे गटशिक्षणाधिकारी अनिल पवार,केंद्रप्रमुख चौधरी,मुख्याध्यापक अर्जुन लोंढे,ज्येष्ठ शिक्षक आरोळे,स्वामी विवेकानंद ग्रुप चे उपाध्यक्ष प्रतीक ताले व्यासपीठावर उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी आईवडील आपल्यासाठी जे कष्ट व मेहनत घेतात याची जाणीव ठेवावी. आपले आईवडील आणि आपल्या घरची परिस्थिती या दोन गोष्टी विद्यार्थ्यांनी सदैव लक्षात ठेवाव्या या दोन गोष्टी आपल्याला वाईट मार्गापासून नेहमी दूर ठेवतील. विद्यार्थ्यांसाठी आईवडील आणि शिक्षक हेच आजच्या काळात खरे आदर्श आहेत.आईवडील आणि शिक्षक आपल्याला जे संस्कार व विचार देतात ते विद्यार्थ्यांनी अंगिकारावे कारण आईवडिल हेच प्रत्येक विद्यार्थ्यांचे पहिले गुरू असतात असे मार्गदर्शन प्रा.राजेश ताले यांनी चला देश घडवूया या विषयांवर बोलतांना केले. पीएम श्री जिल्हा परिषद शाळा विठोली आदर्श म्हणून नावारूपास येत आहे.वाशिम जिल्ह्याच्या शैक्षणिक विकाकासात पीएम श्री शाळा नक्कीच महत्वाची भूमिका बजावतील.

# आम्ही लोकप्रतिनिधी जनतेला उत्तरदायी, चुकीला माफी नाही - बावनकुळेंचा अधिकाऱ्यांना इशारा



**पुणे :** तलाठ्यापासून मंत्रालयातून राज्याचा कारभार चालवणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत आपण 'एक परिवार' आहोत हे ध्यानात ठेवून न घाबरता जनतेची कामे करावी. अनवधानाने झालेली चूक माफ करता येते, जनतेच्या विश्वासाला तडा जाईल अशी चूक जाणीवपूर्वक झाली तर माफी नाही, हेही लक्षात असू द्या, असा कानमंत्र महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्रातील सर्व वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांना दिला.

पुणे येथे दोन दिवस महसूल परिषद होत आहे. या परिषदेच्या उद्घाटन करताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्राची रूपरेषा आखली आहे. ती पूर्णत्वास नेण्यासाठी पडेल ते कष्ट करा. महसूल विभागाला प्रशासनाचा कणा म्हणतात. त्यामुळे लोककल्याणकारी योजना राबविताना समाजाच्या शेवटच्या माणसाची काळजी घ्या. त्याचा कणा ताठ राहिला पाहिजे यासाठी जिवाचे रान करा. राज्याचा कारभार पारदर्शी आणि गतिमान करण्याचे काम महसूल विभागच करू शकतो, हा विश्वास मला आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

पुढील दोन वर्षात एकाही व्यक्तीची सुनावणी बाकी राहता कामा नये असा संकल्प करून महसूल विभागाचा देशात आदर्श निर्माण करावा. शेतकऱ्यांच्या आत्महत्या अतिशय दुर्दैवी आहेत. आपण त्या थांबल्या पाहिजेत यासाठी काम करण्याची गरज आहे. शेतीला पाणी, पाणंद रस्ते, वीज देण्यासाठी पुढाकार घेऊन शेतकऱ्याला सुखी करण्याचे प्रयत्न होऊ द्या. आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. जनतेला आम्ही उत्तरदायी आहोत. जनतेने दिलेली मते ही आम्ही कर्ज समजतो. त्यासाठी जनतेला उत्तरदायी राहणे हे आमचे कर्तव्य आहे. महसूल विभागाने लोकाभिमुख निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. कामात आधुनिकीकरण आणि एआयचा वापर झाला तर महसूल विभाग अधिक चांगले काम करत आहे हे लक्षात येईल. कुटुंब प्रमुख म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी कायम तुमच्या पाठीशी आहे. आपण मिळालेली जबाबदारी ही केवळ जबाबदारी न समजता नाविन्यपूर्ण काम केले पाहिजे. आपल्या काळात एखादे तरी काम चांगले जनतेच्या हिताचे झाले पाहिजे असा उद्देश ठेवा. अनेक किचकट कायदे सोपे केले पाहिजेत, कायदा करताना विधिमंडळातही महसूल विभागावर विश्वास दाखवला जातो, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

आपण नव्याने काही योजना आणत आहोत. यामध्ये वाळू धोरण, देवस्थान जमिनी, भोगवटा दोनच्या जमिनी एक करणे, स्वामित्व योजना, पाणंद रस्ते अशा पद्धतीची कामे केली जाणार आहेत. यासाठी ही कामे करताना अधिकाऱ्यांनी आपली मानसिकता बदलली पाहिजे. सकारात्मक राहा व जनतेची कामे करा. कोणावरही निलंबन, अभियोगाची कारवाई करताना मंत्री म्हणून आनंद होत नाही; मात्र खूप चुकीच्या पद्धतीने काम केले तर त्याच्यावर कारवाई होणार, असा इशाराही चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना दिला.

माध्यमे लोकांसाठी असतात, जनतेचे प्रश्न ते मांडतात. आपल्या विभागातील लोकाभिमुख निर्णयाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या पाहिजेत. माध्यमांना घाबरू नका. आपले चांगले काम त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करा. प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी महिन्यातून किमान एक पत्रकार परिषद घेतली पाहिजे. अनेक ठिकाणी प्रवास करून वेगवेगळे अनुभव आणि चांगले काम माध्यमांसमोर मांडा. सकारात्मक बातम्या समाजाची गरज आहे. माध्यमे सकारात्मकता नक्कीच वाढवतात. प्रवास आणि संवाद हीच आपल्या यशाची पुढची पावले आहेत. इतर राज्यांमध्ये काय चालले आहे याचा देखील अभ्यास करावा, असा कानमंत्र बावनकुळे यांनी दिला.

महसूल विभागातील लोक हे इतर शासकीय विभागांमध्ये जाण्याचे प्रमाण खूप वाढलेले आहे. त्यामुळे महसुल विभागातील कामकाजावर अधिक ताण पडतो. यापुढे असे होणार नाही. इतर ठिकाणी पाठवलेल्या लोकांना पुन्हा महसूल विभागामध्ये आणण्याचे काम पुढील काळामध्ये होऊन आस्थापना अधिक सशक्त केली जाईल, असे सांगून बावनकुळे म्हणाले की, अधिकाऱ्यांनी चुकीचे काम अजिबात करू नये. अगदी मंत्र्यांनी जरी सांगितले आणि नियमात बसत नसेल तर स्पष्टपणे मत नोंदवा, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०५ एप्रिल २०२५


## सेवानिवृत्तांची सेवा म्हणजे परमेश्वराची सेवा समजुन पेन्शनधारकांची सेवा करेन - आमदार प्रविण स्वामी



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले):** महाराष्ट राज्य सेवानिवृत्त शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व अधिकारी संघटना उमरगा शाखेच्या वतीने दि.३एप्रिल रोजी जिल्हा परिषद प्रशाला,उमरगा सभागृहात आयोजित सेवानिवृत्त शिक्षक आमदार प्रविण स्वामी,जाने.२५ते मार्च२५अखेर सेवानिवृत् व पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी,अधिकारी सत्कार सोहळा प्रसंगी सत्काराला उत्तर देताना आ.प्रविण स्वामी म्हणाले " पेन्शनरांची सेवा म्हणजे परमेश्वराची सेवा समजुन सेवानिवृत्तांच्या समस्या सोडवणार आणि वयोवृध्दांना पेन्शन संदर्भात शासकिय कार्यालय,बॅकांना हेलपाटे मारावे लागु नये यासाठी योग्य सुचना संबधिताना दिल्या जातील.आणि जि.प.शाळेत शक्य तेथे इ.९वी,१०वी चा वर्ग सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील. मी स्वत:आज संघटनेचा आजीव सभासद होत असुन सभासदत्व स्विकारत आहे." प्रारंभी सावित्रीबाई फुले प्रतिमा पुजन व दिपप्रज्वलानंतर मान्यवर,सेवानिवृत्तांचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक कमलाकर मोटे यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष देविदास बनसोडे,जिल्हाउपाध्यक्ष तर प्रमुख अतिथी जिल्हाध्यक्ष प्रदिप मोकासे, जि.प.हाय. सोसा.चे चेअरमन पदमाकर मोरे,राज्य संघटक मनोहर वाघमोडे,शिवाजी सुरवसे,जिल्हा सरचिटणीस अशोक साखरे, नुतन गटशिक्षणाधिकारी काकासाहेब साळुंके, तालुकाध्यक्ष शाहुराज चव्हाण हे उपस्थित होते. प्रदिप मोकासे, काकासाहेब साळुंके,विनायक माने,शंकर व्हट्टे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजेंद्र पाटील, दयानंद बेळंबकर, काशिनाथ निर्मळे,विजय पाटील,राजेंद्र पुजारी, श्रीम. प्रेमकला व्हंताळकर, चंद्रकला पाटील व इतरांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास वयोवृध्द पेंन्शनधारकांची उपस्थिती कडक्याच्या उन्हातही लक्षणीय होती.सुत्रसंचलन राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षिका सरिता उपासे तर पदमाकर मोरे यांनी"सेवानिवृत्तांनी जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी गुढी पाडवा,पट वाडवा. अभियानात सहभागी होऊन सहकार्य करावे."असे आवाहन करुन उपस्थितांचे अभार मानले.






## मुंबईत भरधाव स्कॉर्पिओची रिक्षाला धडक



**मुंबई :** मुंबईत सीआयएसएफ जवानाने दारूच्या नशेत गाडी चालवत एका रिक्षाला उडवल्याची घटना घडली आहे. या घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला आहे. यानंतर या जवानाला पोलिसांनी अटक केली आहे. मुंबई येथील वनराई परिसरातील पश्चिम द्रुतगती महामार्गावर ही घटना घडली आहे. जवानाने भरधाव स्कॉर्पिओ गाडी चालवत रिक्षाला धडक दिली. ही घटना ३ एप्रिलच्या मध्यरात्री घडली आहे. यावेळी रिक्षात एक महिला व दोन मुली होत्या. यात महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर दोघी मुली गंभीर जखमी झाल्याचे समजते.

पोलिसांनी अपघातातील स्कॉर्पिओ गाडी व रिक्षा ताब्यात घेतला असून पुढील तपास सुरू केला आहे. जवान धुंधराम यादव दारूच्या नशेत असल्याचे वैद्यकीय तपासणीत समोर आले आहे. दारूच्या नशेत भरधाव वेगात गाडी चालवत असताना रिक्षाला जोरची धडक बसली. यात हजरा इस्माईल शेख या ४८ वर्षीय महिलेचा जागेवरच मृत्यू झाला आहे. या अपघातात रिक्षा चालक सोनू यादव आणि मृत महिलेच्या दोन मुली शाहीन इस्माईल शेख (२०) आणि शिरीन इस्माईल शेख (१७) या गंभीर जखमी झाल्या आहेत. रिक्षाचालक व या दोन मुली यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अधिकची माहिती अशी की, मालाडच्या दिशेने जाणाऱ्या रिक्षाला विरुद्ध दिशेने येणाऱ्या जवान धुंधराम यादव यांचे स्कॉर्पिओ गाडीने जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. हा अपघात जवानांनी दारू पिऊन राँग साईडने गाडी चालवल्यामुळे हा अपघात झाल्याचा आरोप मृत महिलेच्या नातेवाईकांनी केला आहे.

या प्रकरणी वनराई पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०५, १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) आणि मोटार वाहन अधिनियम कलम १८४, १८५, १७७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी जवानाला वनराई पोलिसांनी कोर्टात हजर केले असता बोरिवली कोर्टाने जवानाला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## दीनानाथ रुग्णालयातील घटना असंवेदनशीलतेचा परिचय



**मुंबई :** पुण्याच्या दीदानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. दीनानाथ रुग्णालयाने महिलेला ॲडमिट करून घेणे गरजेचे होते. भविष्यात अशा घटना पुन्हा होवू नये यासाठी कडक कारवाई करू, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. धर्मदाय रुग्णालयांनी आपली भूमिका योग्य प्रकारे निभावली पाहिजे. धर्मादाय रुग्णालयांकडून नैतिकतेचे पालन होते की नाही, यासंदर्भात आपण प्रयत्न करणार आहोत, असेही ते म्हणाले.

पुण्यातील दीदानाथ मंगेशकर रुग्णालयाने पैशांअभावी गर्भवती महिलेवर उपचार करण्यास नकार दिल्याने महिलेचा जीव गेल्याची घटना गुरुवारी घडली होती. या घटनेवर आता विविध राजकीय लोकांच्या प्रतिक्रिया समोर येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणावर प्रतिक्रिया देत या घटनेतून असंवेदनशीलतेचा परिचय पाहायला मिळाल्याचे ते म्हणाले. तसेच भविष्यात अशा प्रकाराच्या घटना घडू नये यासाठी कडक कारवाई करण्याचा इशारा त्यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

पुण्याच्या दीदानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. कुठेतरी असंवेदनशीलतेचा परिचय या घटनेतून पाहायला मिळतो. दीदानाथ मंगेशकर हे अतिशय प्रतिष्ठित रुग्णालय आहे. लता दीदींनी स्वत: पुढाकार घेऊन आणि मंगेशकर कुटुंबीयांनी रुग्णालयाच्या पाठीमागे आपले संसाधने उभे करून हे रुग्णालय उभे केले. ज्याप्रकारे तिथल्या काही डॉक्टरांनी किंवा कर्मचाऱ्यांनी अतिशय असंवेदनशीलतेने प्रसुतीला आलेल्या महिलेला दाखल करून घेण्यास नकार दिला किंवा अधिकचे पैसे मागितले. लोकांमध्ये या संपूर्ण प्रकरणाची अतिशय चीड आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

विशेषत: धर्मदाय रुग्णालयांनी आपली भूमिका योग्य प्रकारे निभावली पाहिजे. अशी आपली सर्वांची अपेक्षा आहे. त्यामुळे या संदर्भात एक उच्च स्तरीय समिती तयार केलेली आहे. ही समिती या घटनेचा तपास करेलच, त्यासोबत अशा घटना होवू नये म्हणून कडक कारवाई केली जाईल. पैशांची चिंता न करता महिलेला ॲडमिट करून घेणे गरजेचे होते. धर्मादाय रुग्णालयांकडून नैतिकतेचे पालन होते की नाही, यासंदर्भात आपण प्रयत्न करणार आहोत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. दीदानाथ रुग्णालयातील प्रकाराबाबत मुख्यमंत्री वैद्यकीय कक्षाने लक्ष घातले होते. परंतू, रुग्णालयाकडून योग्य प्रतिसाद मिळाला नाही. भविष्यात अशा प्रकाराच्या घटना घडू नये यासाठी कडक कारवाई करण्याचा आमचा मानस असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

याच अधिवेशनात आपण एक कायदा पारित केला आहे. लॉ आणि ज्युडीशिअरीकडून हा लागू होईल. धर्मादाय रुग्णालयांनी किती पैसा खर्च केला कसा केला आणि जबाबदाऱ्यासंदर्भात नियंत्रण ठेवण्याचे काम करेल. रुग्णालय असे ताब्यात घेता येत नाही. मात्र, धर्मदाय आयुक्तांना अधिकार आहेत की, नेमकी काय कारवाई करावी असा निर्णय ते घेऊ शकतात,असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.